**महाराष्ट्र शासन**

क्र : व्हीएलएस १००२/(५१७/२००२/प्राशि -३
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २ जुलै, २००२

प्रति,
शिक्षण उपसंचालक,
नाशिक विभाग,
नाशिक

**विषय : कला सुगंध मंडळ, माजिवडा, जि.ठाणे या संस्थेच्या माजिवडा, जि.ठाणे येथील मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळेच्या इ.५वी ते ७वी च्या प्रत्येकी एका वर्गास परवानगी मिळणेबाबत**

**संदर्भ : शासनपत्र क्र. व्हीएलएस १०९७/(८०८)/प्राशि-३, दि. २०.८.१९९८**

संदर्भिय शासन पत्रान्वये कला सुगंध मंडळ, माजिवडा, जि.ठाणे या संस्थेच्या मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळेस माजिवडा, जि.ठाणे या ठिकाणी सन १९९८-९९ या शैक्षणिक वर्षापासून कायम विना अनुदान तत्वावर इ. १ ली च्या एका वर्गास परवानगी देण्यात आलेली आहे.

सदर संस्थेने शासनास केलेल्या विनंतीनुसार संस्थेच्या प्राथमिक शाळेस इ.५वी ते ७वी च्या प्रत्येकी एका वर्गास जून २००२ पासून कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही तसेच भविष्यात अनुदानाची मागणी करणार नाही व " सदर वर्ग प्रत्यक्षात सुरु असतील " या अटीवर शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच शासनपत्र क्र. व्हीएलएस १०००/(५५७/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक : १६ सप्टेंबर, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेच्या इ.५वी ते ७वी च्या प्रत्येकी एका वर्गास परवानगी देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी.

(वि. व. चिंदरकर)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत :- तात्काळ कार्यवाहीसाठी रवाना,
१) प्राथमिक शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, ठाणे